## साहित्याचा आढावा

1960 नंतर स्त्रियांच्या साहित्यातील बदलाच्या दिशा स्पष्ट होऊ लागल्या. यात प्रामुख्याने दोन वर्गातील स्त्रियांचे लेखन स्त्रीवादी परिप्रेक्ष्यातून तपासता येण्यासारखे आहे. एक म्हणजे उच्चवर्गीय स्त्रियांनी त्यांच्या विकसित जाणीव विश्वाचे प्रकटीकरण साहित्यातून केले आणि दुसरे म्हणजे दलित स्त्रियांनी निर्माण केलेले साहित्य होय. या दोन्ही प्रकारच्या साहित्यातून स्त्रियांची माणूस म्हणून जगण्याची आकांक्षा स्पष्ट होताना दिसते. स्त्रीवादी चळवळीचा प्रभाव, परिणाम आणि माणूस म्हणून जगण्याची निर्माण झालेली आकांक्षा, त्यासाठी होणारी घुसमट, संघर्ष यांचे प्रतिबिंब स्त्री लेखिकांच्या साहित्यात अभिव्यक्त झालेले आढळते.[1]

'गौरी देशपांडे' यांनी नायिका प्रधान कथा–कादंबऱ्यांची निर्मिती केली. या कथा आणि कादंबरीतले जग उच्चमध्यवर्गीय आहे आणि ते जग विचारशील पध्दतीने मांडले गेले आहे.[2]

'आहे हे असं आहे' (1986) या कथा संग्रहातील कथा अनेक नियतकालिकांमधून 1970 ते 1980 या काळात प्रसिध्द झालेल्या आहेत.[3]

'एकेक पान गळावया' हे पुस्तक मौज प्रकाशनाने 1980 मध्ये प्रकाशित केले. यात तीन लघु कादंबऱ्यांचा समावेश आहे.[4]

'तेरूओ आणि काही दूरपर्यंत' (1985) या लघुकादंबरीत तेरूओ वरील प्रेमाची उत्कट कहाणी गौरी देशपांडे यांनी चित्रित केली आहे.[5]

काही दूर पर्यंत (1985) या लघुकादंबीला राजकीय संदर्भ आहेत. आधुनिकता आणि भांडवलशाही व्यवस्था, राजकारणातील बदलती समीकरणे, मार्क्सवाद, समाजवाद या सगळया विचारसरणींचा पुरस्कार करणारी माणसे या कादंबरीत आहेत.[6]

'निरगाठी' आणि 'चंद्रिके ग सारिके ग' ही पुस्तके मौज प्रकाशनाने 1987 मध्ये प्रकाशित केली. निरगाठी या लघुकादंबरीत गौरी देशपांडे यांनी नातेसंबंधाचा शोध घेतला आहे.[7]

'दूस्तर हा घाट' आणि 'थांग' या गौरी देशपांडे यांच्या दोन लघुकांबऱ्या मौज प्रकाशनाने एकत्रितपणे 1989 मध्ये प्रकाशित केल्या.[8]

या लघुकादंबरीत पोरकी असलेली नमु आणि श्रीमंतीत वाढलेला वनमाळी यांच्या प्रेमाचे चित्रण आहे.

मेघना पेठे यांना आपल्या स्त्री केंद्री आशयसंपन्न कथांनी मराठी वाङमयात मोलाची भर टाकली. मेघना पेठे यांचे 'हंस अकेला' (1997) या कथा संग्रहात एकूण सात कथा आहेत. विविध दिवाळी अंकातून या कथा पुर्वप्रकाशित झाल्या आहेत. (यात स्त्री–पुरूष दोघेही) आयुष्यातील अपूर्णता मग ती अपूर्णता शारीरिक असेल किंवा मानसिक असेल आणि ही अपूर्णता मग ती पूर्ण करण्यासाठी त्यांनी केलेली केविलवाणी धडपड मेघनांनी अत्यंत सरळपणे आणि स्पष्टपणे मांडली आहे'.[9]

'आंधळयाच्या गायी' हा मेघना पेठे यांचा कथासंग्रह 2000 मध्ये प्रकाशित झाला. 'एक ननैतिक बघ्या' या संग्रहातील पहिली कथा. ही कथा म्हणजे नायक आणि त्याचा कुत्रा सदानंद यांच्यातील संवाद आहे.[10]

'नातिचरामि' ही कादंबरी 2005 मध्ये प्रकाशित झाली. यात 'मीरा' आणि 'ती' या दोन स्त्रियांच्या आयुष्यांची चित्रणे आहेत. ही कादंबरी म्हणजे वास्तव आणि काल्पनिकता यांचे मिश्रण आहे. 'कुठलीही कलाकृती ही वास्तविक आणि काल्पनिकतेची बेमालूम सरमिसळ असते', असे मत मेघना पेठे व्यक्त करतात. लग्नव्यवस्था, घटस्फोट आणि स्त्री–पुरूष नातेसंबंधाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.[11]

'स्थलांतर' ही सानियांची कादंबरी 1994 मध्ये प्रकाशित झाली. नाते संबंधाची गुंतागुंत आणि त्यात भरडले जाणारे स्त्री–पुरूष दोघांचेही आयुष्य यांचे चित्रण या कादंबरीत केले आहे.[12]

सनियांची 'आवर्तन' ही दुसरी कादंबरी 1996 मध्ये प्रकाशित झाली. स्थलांतराप्रमाणेच या कादंबरीतील स्त्रिया देखील परिस्थितीशी संघर्ष करीत स्वतःचे स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न करताना दिसतात.[13]

सनियांचा 'ओळख' हा कथासंग्रह 1992 मध्ये प्रकाशित झाला. या कथासंग्रहातील चारही कथांद्वारे आधुनिक जगात वावरणाऱ्या माणसांच्या भावनिक संघर्षाचे चित्रण केले आहे.[14]

बदलत्या मानवी संबंधाचे चित्रण 'प्रयाण' या 1997 मध्ये प्रकाशित झालेल्या सानिया यांच्या कथा संग्रहामध्ये प्रभावीपणे दिसते.[15]

प्रिया तेंडुलकर यांनी आपल्या कथांमधून स्त्रियांच्या प्रश्नांचे चित्रण केले आहे. 'जावे तिच्या वंशा', 'जन्मलेल्या प्रत्येकाला' हे कथासंग्रह, 'अस ही' हा ललित लेख संग्रह प्रसिध्द  आहे.[16]

'ज्याचा त्याचा प्रश्न' हा कथासंग्रह 1987 मध्ये प्रकाशित झाला. या संग्रहात अकरा कथांचा समावेश आहे. प्रिया तेंडुलकर यांच्या कथालेखनात आशयाच्या प्रगल्भतेबरोबरच सामाजिक प्रश्नांची यथायोग जाणीव अभिव्यक्त होताना दिसते.[17]

'जन्मलेल्या प्रत्येकाला' हा कथासंग्रह डिसेंबर 2001 मध्ये प्रकाशित झाला. या संग्रहातील पहिलीच कथा 'वारे', यात कॉर्पोरेट जगात स्वतःचे स्थान निर्माण करणाऱ्या रेणुका पाटीलची कथा आहे. ती एम.बी.ए. झाली आहे आणि मुंबईत आपलं स्थान निर्माण करण्यासाठी धडपडते आहे.[18]

प्रिया तेंडुलकर यांचा 'जावे तिच्या वंशा' हा कथासंग्रह 2000 मध्ये प्रकाशित झाला. 'अनुची आई' या कथेत प्रौढत्वाकडे झुकणारी आई आणि तारूण्यात पदार्पण करणारी मुलगी यांच्या चित्रणाबरोबरच नवऱ्याने टाकलेल्या बाईचे आयुष्य चित्रित केले आहे.[19]

'ब्र' ही कविता महाजन यांची वास्तववादी कादंबरी. मे 2005 मध्ये प्रकाशित झाली. राजकीय जीवनात कार्यरत असलेल्या आणि स्वतःचे अस्तित्व शोधू पाहणाऱ्या आदिवासी स्त्रियांची संघर्षगाथा अत्यंत प्रभावीपणे मांडण्याचा प्रयत्न या कादंबरीतून केला आहे.[20]

कविता महाजन यांची ‘भिन्न’ ही कादंबरी जुलै 2007 मध्ये प्रकाशित झाली. या कादंबरीत लेखिकेने एड्सग्रस्त स्त्रियांचे प्रश्न हाताळले आहेत.

‘ब्र’ आणि ‘भिन्न’ या दोन्ही कादंबऱ्याद्वारे एक सक्षम आणि सामाजिक प्रश्नांची अचूक जाण असलेली लेखिका म्हणून कविता महाजन यांनी आपले मराठी साहित्यातील स्थान भक्कम केले आहे.[21]

‘जे दर्पणी बिंबले’ आणि ‘ओल हरवलेली माती’ या कथासंग्रहानंतरचा ‘पावसात सुर्य शोधणारी माणसं’ हा नीरजाचा 2005 ते 2007 या काळात लिहीलेला दहा कथांचा हा संग्रह आहे. स्त्री–पुरूष नाते देहमनाचे आहे. त्यात कधी शरीर नात्याचे आविष्करण करणारे तरल वाद्य (वादय) होते तर कधी हे आक्रमक प्रसंगी हिंस्त्र होते. या साऱ्यात गुंतलेली पात्रे नीरजा यांच्या कथेत येतात.[22]

‘ओल हरवलेली माती’ हा नीरजा यांचा कथासंग्रह 2006 मध्ये प्रकाशित झाला. त्यांची कथा व्यक्तिरेखा केंद्री आहे.[23]

आशा बगे यांची ‘बंदिशाळा’ ही कथा नवऱ्याच्या छळाने ग्रासलेल्या तीन स्त्री पात्रांची मांडणी अर्थपूर्ण आहे.[24]

पुरूषांनी वैवाहिक नात्याचा अवमान करून पत्नीला स्वातंत्र्य नाकारणे पण इतर स्त्रियांना मात्र मनोमन ‘गृहीत’ धरणे, वस्तुवत मानणे यातील पुरूषी दाभिकता अनेक स्त्रीकथाकारांनी उघड केली आहे. मंगला गोडबोले यांच्या ‘सख्या रे’, ‘आडवी रेघ’ उर्मिला पवार यांची ‘हातचा एक’, सुनिती आफळे यांच्या ‘दुरावा’ अशा अनेक कथांमधून ही अभिव्यक्ती जाणवते.[25]

वाचेने केलेला व्यभिचार ही पुरूष दुटप्पी मुल्ये सुचित कसा करतो ते ‘भस्मासूर’ या सुधा नरवणे यांच्या कथेतून प्रत्ययाला येते.[26]

कमल देसाई यांचा 1975 च्या पुढील कालखंडातील संग्रह ‘रंग’. या संग्रहातील स्त्रीप्रधान कथातून आधुनिक जगातील आजच्या युगातील माणसाच्या जगण्यातील अनेक पेच व्यक्त होतात. [27]

‘तांडव’, ‘परत्र’, ‘अर्थ’ इत्यादी कथातून त्या जगण्याच्या पेचावरील मार्ग ही आडवळणाने सुचविले जातात.[28]

गिरीजा किर यांनी स्त्री जीवनातील प्रश्न मांडण्याचा प्रयत्न केला. पण त्यांचा दृष्टिकोन पारंपारिकच आहे. त्यांच्या कथांमधून त्यांचा कुटूंब व्यवस्था आणि विवाहसंस्था यावरील विश्वास प्रकट होतो. कैफियत, स्वरांची लय, शतगंधिनी यासारखे त्यांचे कथासंग्रह प्रकाशित आहेत.[29]

कुमुदिनी रांगणेकर, नयना आचार्य, कुसुम अभ्यंकर, विजया वाड यासांरख्या अनेक लेखिका पारंपारिक परिप्रेक्ष्यातून कथालेखन करताना दिसतात.[30]

ज्योत्सना देवधर यांच्या कथा स्त्री केंद्री आहेत. देवदासी, वेश्या, आदिवासी, प्रौढ कुमारिका, इ. प्रश्नांचे चित्रण केले आहे.[31]

पुरूषप्रधान व्यवस्थेत स्त्रियांची होणारी घुसमट विजया राजाध्यक्ष यांनी अत्यंत प्रभावीपणे चित्रीत केली आहे.[32]

आशा बगे यांचे कथा लेखन स्त्री अनुभव विश्वाच्या दृष्टीने महत्वपूर्ण आहे. मध्यमवर्गीय आणि विशेषकरून ब्राम्हण वर्गातील स्त्रियांचे चित्रण त्यांनी आपल्या कथांमधून केले आहे.[33]

अस्तित्ववादी कथांची निर्मिती हे कमल देसाई यांच्या कथालेखनाचे वैशिष्टय. स्त्रियांच्या सर्व सामान्य प्रश्नांना कमल देसाई यांच्या कथेत फारसे स्थान नाही.[34]

ग्रामीण कथेच्या क्षेत्रात आपले महत्वपूर्ण योगदान देणाऱ्या प्रतिमा इंगोले यांचे हिरवे स्वप्न, अकसिदीचे दाणे, जावयाचे पोर, सुगरणीचा खोपा, इ. कथासंग्रह प्रसिध्द आहेत.[35]

स्त्रियांच्या कथा या प्रामुख्याने कुटुंब केंद्रित आहेत. 1960 ते आजतागायत अनेक लेखिका याच पध्दतीने लेखन करताना दिसतात. कमल देसाई आणि स्त्रीवादी लेखिका म्हणून ज्यांचा उल्लेख केला जातो त्या गौरी देशपांडे, सानिया, मेघना पेठे, प्रिया तेंडुलकर यांच्या कथा याला अपवाद आहेत.[36]

प्रतिमा जोशी यांच्या संग्रहातील ‘नग्न सत्य’, ‘जहन्नम’, तेरावी गल्ली’, ‘दरी’ या चार कथा ज्यांना वेश्यावृत्ती स्विकारावी लागली आहे अशा मुली—बायकांच्या आयुष्याशी संबंधित आहेत.[37]

‘भूप’ हा मोनिका गजेंद्रगडकर यांचा पहिलाच कथा संग्रह नातेसंबधचा वेध हे अंत:सूत्र यांतील कथांमध्ये जाणवतं.[38]

वेगवेगळया स्तरांतील स्त्रियांच्या वाटच्या वेदनांची, त्यांच्या जगण्याच्या प्रश्नांची आणि त्यांच्या स्वसामर्थ्यांच्या कणखर प्रतिमांची स्त्रीकेंद्री अशी सहा कथा शिल्प या मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथासंग्रहात आहेत.[39]

स्त्रियांच्या आयुष्याचे विविध कंगोरे, आधुनिक जीवनदृष्टी स्विकारल्यानंतर ही स्त्रियांवर पारंपारिकतेची झालेली सक्ती आणि यातून निर्माण झालेल्या अनेक नव्या प्रश्नांच्या हिंदोळयावर हेलकावे खाणारे स्त्रीमन, काय चांगले आणि काय वाईट यांच्या निर्णयापर्यंत पोहोचण्यासाठी होणारी असहय घुसमट आणि या प्रश्नांची मांडणी करू पाहणाऱ्या गौरी देशपांडे पासून मोनिका गजेंद्रगडकर पर्यंत सगळया लेखिकांनी आत्मभान प्रकट केले आहे.[40]